# Dr & CA Kirit Somaiya

**B. Com., F.C.A. Ph. D**

**Ex - Member of Parliament**


**आर.आर.पाटील,** **७ ऑगस्ट १३**

**गृहमंत्री,**

**महाराष्ट्र**

**विषय : नितेश राणे ट्विट.**

महोदय,

श्री. नितेश राणे यांच्या ट्विट्ला आता मा. मंत्री महोदय नारायण राणेंचेही समर्थन प्राप्त झाले आहे. अर्थात या वादात राणे परिवाराने माझे व श्री. मंगलप्रभात लोढांचेही नाव गुंतविले आहे.

**रोख ठोख -डॉ. उदय निरगुडकर व नितेश राणे खासदार झी २४ तास ५ ऑगस्ट २०१३, रात्री ९.३०**

**नितेश राणे : त्यांच्या इशा-याला अर्थ काय हो? इशा-यांशिवाय ते लोक करत काय आले देशामध्ये, त्यांना इशारा अगर खरच दयायचा असेल, कारवाही करायची असेल ना तर त्यांच्याच किरीट सोमैयानी एक पी.आय.एल. बोम्बे हायकोर्टात केली आहे जीथे लिहीलेले आहे की बाबा, महानगर पालिकेंच्या शाळांमध्ये मराठी तुम्ही भाषा काढून टाका असे किरीट सोमैया यांनी हायकोर्टामध्ये लिहिलेले आहे.** मराठी शाळांमधून मराठी काढून टाका अशी मागणी किरीट सोमैया यांनी केली आहे असेही श्री. राणे म्हणाले..(सोबत झी २४ तासवर नितेश राणे नी दिलेली मुलाखत( सी.डी. ट्रान्सक्रिप्ट )देत आहोत.)

**"मराठी भाषा, मराठी संस्कृती, महाराष्ट्राची अस्मिता ........... यांची अवमान करण्याची, अशी कोणत्याही प्रकारची याचिका मी मुंबई हायकोर्टात केलेली नाही. श्री. राणे परिवाराने त्याची प्रत दयावी अशी विनंती आहे.**

मॉ (आई ), मातृभाषा, राज्यभाषा,राष्ट्रभाषा याबद्दल सगळयानांच आदर असतो, असलाच पाहिजे .मला व माझ्या परिवारालाही आहे. माझी मातृभाषा गुजराती तर माझ्या मुलाची मातृभाषा मराठी आहे.'महाराष्ट्राची संस्कृती, अस्मिता याबद्दल आम्हाला अभिमान आहे. मराठी भाषा व आपली संस्कृती गर्व करण्यासारखी आहे.

मला, माझ्या पत्नीला व मुलाला नरेंद्र मोदींचा 'विकास व व्हिजन' बद्दल निश्चितपणे आदर आहे . नरेंद्र मोदींनी पंतप्रधान व्हायला हवे अशी आमची सगळ्यांची इच्छा आहे. श्री. नितेश राणे व मा. नारायण राणे यांना मला प्रश्न विचारायचा आहे की मी , माझी पत्नी, माझ्या मुलानेही महाराष्ट्र सोडून गुजरातला निघून जावे का?

राजकीय मतभेद असू शकतात. मा. नरेंद्र मोदींच्या नेतृत्व व पंतप्रधान होण्यासंबधी राणे परिवार व कॉंग्रेसची वेगळी मत असू शकतात . परंतु त्यासाठी समाजात विद्वेश फैलावणारी भाषा, उद्गार, चर्चा करणे आम्हाला योग्य वाटत नाही. माझ्या, माझा परिवार , सहकारी किंवा पक्षाकडून यात कुठे चूक झाली असेल तर आम्ही निश्चित सुधारून घेवू. राणे परिवाराच्या विधानाप्रमाणे आम्ही गुन्हा केला आहे. आपण याची चौकशी करावी, तपास करावा या विनंतीसाठी मी आपल्या सेवेत हजर झालो आहे.

आपला,

किरीट सोमैया

**किरीट सोमैया**


● Neelam Nagar, Mumbai 400081. Tel.: 022-21634152 ● 11, Ashoka Road, New Delhi 110001
E-mail : kiritsomaiya@gmail.com